
# २. कम्म-फलं

प्रस्तुत पद्यपाठ रत्नशेखरसूरींनी लिहिलेल्या 'सिरीसिरीवाल कहा' या प्राकृत काव्य ग्रंथातून घेतलेला असून पूर्व जन्मातील कर्मानुसारच जीव चांगले-वाईट फळ कसे भोगतो ते, या कवितेत स्पष्ट केलेले आहे.

विवाहामुळे कौटुंबिक जीवनामध्ये स्थैर्य प्राप्त होत असल्यामुळे भारतीय संस्कृतीमध्ये विवाहास अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान असलेले दिसून येते. त्यामुळे आईवडील किंवा इतर नातेवाईक आपल्या मुलामुलींचे विवाह करून देतात. त्यातील काहींचे वैवाहिक जीवन पूर्णता सुखी होते तर काहींचे जीवन पूर्णता दुःखाने भरलेले असते.

ज्यांचे जीवन दुःखमय आणि संकटमय होते ते तरुण-तरुणी विवाह ठरविणाऱ्यांना किंवा आपल्या आईवडिलांना किंवा नातेवाईकांना दोष देत असतात; परंतु अशाप्रकारे इतरांना दोष देणे अज्ञानपणाचे आणि व्यर्थ असते. कारण हा परिणाम म्हणजे पूर्वी केलेल्या (म्हणजे पूर्वजन्मातील असो की या जन्मातील) कर्माचे फळ म्हणून ते या जन्मात दुःख कष्ट भोगत असतात. तेव्हा आईवडिलांना किंवा इतरांना दोष न देता शांतपणे आणि धैर्याने केलेल्या कर्माचे फळ भोगले पाहिजे, तरच त्यांना सुखाची प्राप्ती होऊ शकते. हे या कवितेतून मदनसुंदरी राजकन्येच्या उदाहरणातून स्पष्ट केलेले आहे.



अह मयणसुंदरी वि हु रन्ना नेहेण पुच्छिया, 'वच्छे।
केरिसओ तुज्झ वरो कीरउ'? मह कहसु अविलंबं।।1।।

सा पुण जिण-वयण-वियार-सार-संजणिय-निम्मल-विवेआ।
लज्जागुणिक्क-सज्जा अहो-मुही जा न जंपेइ।।2।।

ताव नरिंदेण पुणो पुट्ठा सा भणइ ईसि हसिऊणं।
'ताय' विवेय-समेयं मं पुच्छसि तं सि किमजुत्तं।।3।।

जेण कुल-बालिआओ न कहंति हवेउ एस मज्झ वरो।
जो किर पिऊहिं दिन्नो सो चेव पमाणिय-व्वुत्ति।।4।।

अम्मा-पिउणो वि निमित्त-मेत्तं होइ वर-पयाणम्मि।
पायं पुव्व-निबद्धो, संबंधो होइ जीवाणं।।5।।

जं जेण जया जारिसमुवज्जियं होइ कम्मं सुहमसुहं।
तं तारिसं तया से, संपज्जइ दोरिय-निबद्धं।।6।।

जा कन्ना बहु-पुण्णा, दिन्ना कु-कुले वि सा हवइ सुहिया।
जा होइ हीण-पुण्णा, सु-कुले दिन्ना वि सा दुहिया।।7।।

ता ताय! नाय-तत्तस्स तुज्झ नो जुज्जए, इमो गव्वो।
जं मज्झ कय-पसायापसायओ सुह-दुहे लोए।।8।।

तो दुम्मिओ य राया भणेइ 'रे तं सि मह पसाएण।
वत्थालंकाराइ पहिरंती कीसिमं भणसि?'।।9।।

हासिऊण भणइ मयणा, 'कय-सुकय-वसेण तुज्झ गेहम्मि।
उप्पन्ना ताय! अहं तेणाणुहवामि सुक्खाइं'।।10।।

पुव्व-कयं सु-कयं चिय जीवाणं सुक्ख-कारणं होई।
दुकयं च कयं दुक्खाणं कारणं होइ निब्भंतं।।11।।

## शब्दार्थ

**मयणसुंदरी** – मदनसुंदरी
**वच्छे (वत्से)** – मुली
**कहसु** – आज्ञा, सांग
**वियारसार** – श्रेष्ठ विचार, तात्पर्य
**रन्ना** – राजा
**नेह** – वात्सल्य
**केरिस** – कसा
**दुम्मिय** – दुखावलेला
**लज्जगुणिक्कसज्जा** – लज्जा-संकोच गुणाने युक्त
**ईसि** – किंचित
**विवेयसमेयं** – विवेकी
**किर** – खरोखर
**संजणिय** – उत्पन्न झालेला
**निम्मलविवेय** – शुद्ध, सारासार विचार
**अहोमुही** – नतमस्तक
**जंप** – बोलणे
**जेण** – ज्यायोगे
**हवेउ** – असावा
**पिऊहिं** – वडिलांनी
**वरपयाण** – (वरप्रदान) वर शोधून देणे
**पायं** – बहुतांशी
**संपज्जइ** – प्राप्त करतो
**बहुपुण्णा** – पुण्यवान

**नायतत्त** – तत्त्वज्ञान जाणणारा
**उवज्जिय** – संपादित, संचित
**दोरिय–निबद्धं** – दोऱ्याने बांधलेले
**नो जुज्जए** – योग्य नाही

**पहिरंती** – परिधान करणारी
**निब्भंतं** – निश्चितपणे
**उप्पन्ना** – जन्मास आले
**कय–पसायापसायओ** – कृपा किंवा अवकृपा करण्यामुळे

## कृती

**1. समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) नरिंद | अ) कन्ना |
| (ii) वर | आ) पई |
| (iii) सुद्ध | इ) किंचि |
| (iv) बालिया | ई) राया |
| (v) ईसि | उ) निम्मल |

**2. खालील शब्दांचे अर्धमागधी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| (i) राजा | |
| (ii) मदनसुंदरी | |
| (iii) वडील | |
| (iv) मुलगी | |
| (v) जिनवचन | |
| (vi) वात्सल्य | |

**3. गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (i) | रन्ना | नरेंद्र | पन्ना | |
| (ii) | अम्मा | दिया | माया | |
| (iii) | बालिया | कन्ना | सुय | |
| (iv) | माय | ताय | पिऊ | |
| (v) | मुह | लोयण | वयण | |

**4. खाली दिलेल्या गाथेचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

अम्मा–पिऊणो वि निमित्त–मेत्तं होइ वर–पयाणम्मि।
पायं पुव्व–निबद्धो, संबंधो होइ जीवाणं।।

**5. चौकटी पूर्ण करा.**

(i) लज्जेने अधोमुखी होणारी → ☐
(ii) मदनसुंदरीवर क्रोधिष्ट झालेला → ☐
(iii) कर्मसिद्धांतावर श्रद्धा ठेवणारी → ☐

**6. मदनसुंदरीच्या कथेच्या आधारे कर्मसिद्धांत स्पष्ट करा.**